वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरूवार दि. ६ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# करूणा मुंडेंच धनंजय मुंडेंच्या पहिल्या पत्नी

## आता दरमहा मिळणार दोन लाखांची पोटगी,वांद्रे कोर्टाचा निर्णय



## धनंजय मुंडेंच्या घरगुती वादातही वाल्मिक कराड 'व्हिलन'-करूणा मुंडे

मुंबई, (दिव्य न्युज):- सरपंच संतोष देशमुख यांचं हत्या प्रकरण आणि दोन कोटींच्या खंडणी प्रकरणात दिवसेंदिवस कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांच्या अडचणी वाढताना दिसत आहेत. आता आणखी एका प्रकरणात धनंजय मुंडे अडचणीत सापडले आहेत. करुणा मुंडे यांच्याकडून दाखल करण्यात आलेल्या घरगुती हिंसाचाराच्या प्रकरणात धनंजय मुंडे यांना दोषी ठरवण्यात आलं आहे. कोर्टाने दोन लाखांची पोटगी देण्याचे आदेश धनंजय मुंडेंना दिले आहेत. कोर्टाच्या या निर्णयानंतर करुणा मुंडे यांनी पहिली प्रतिक्रिया दिली असून त्यांनी धनंजय मुंडे यांच्यासह खंडणी आणि संतोष देशमुख प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मीक कराडवर गंभीर आरोप केले आहेत.

वाल्मीक कराडने आपल्याला दमदाटी केली पण मी संघर्ष केला. त्यांनी माझा आणि माझ्या कुटुंबीयांचा शारीरिक छळ केला गेला. माझ्या कारमध्ये रिव्हॉल्वहर टाकण्यात देखील वाल्मीक कराडचा हात होता, असा गंभीर आरोप करुणा मुंडे यांनी केला आहे. करुणा मुंडे यांच्या आरोपांमुळे वाल्मीक कराडचा केवळ बीडच्या राजकारणातच नव्हे तर कौटुंबीक वादात देखील हस्तक्षेप होता, अशी चर्चा सुरू झाली आहे.

कोर्टाच्या निर्णयावर प्रतिक्रिया देताना करुणा मुंडे पुढे असंही म्हणाल्या की, माझ्या कुटुंबात मी आणि माझी दोन मुलं असे तिघेजण आहोत, त्यामुळे आम्ही प्रत्येकी पाच लाख या हिशेबाने दरमहा १५ लाखांची मागणी केली होती. मात्र कोर्टाने २ लाखांची पोटगी देण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे मी पुन्हा कोर्टात जाणार आहे.शिवाय यावेळी करुणा मुंडे यांना अश्रू अनावर झाले. ढसाढसा रडत त्यांनी आपल्या भावनांना मोकळी वाट करून दिली. मला जो त्रास झाला, तो शब्दात मांडता येऊ शकत नाही. बिना नवऱ्याचं जगणं अत्यंत अवघड आहे. नवरा खूप मोठ्या पदावर असताना,

▶▶ पान २ वर

Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

### धनंजय मुंडे यांची प्रॉपर्टी किती? करुणा मुंडे यांनी आकडाच सांगितला!

मंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात कौटुंबिक हिंसाचाराचा आरोप करत न्यायालयात गेलेल्या करुणा शर्मा यांना मोठे यश आलेले आहे. करुणा शर्मा यांनी केलेले आरोप वांद्रे येथील कौटुंबिक न्यायालयाने अंशतः मान्य केले आहेत. न्यायालयाच्या निर्णयाचे करुणा शर्मा यांनी स्वागत केले परंतु न्यायालयाच्या निर्णयावर पूर्णपणे समाधानी नसल्याचे त्या म्हणाल्या.

मंत्री धनंजय मुंडे घरगुती हिंसाचारात दोषी आढळल्यानंतर करुणा शर्मा यांनी पत्रकार परिषद घेतली. धनंजय मुंडे यांची करोडोंची संपत्ती आहे. परंतु त्यातील एक रुपयांची संपत्तीही माझ्या किंवा माझ्या मुलांच्या नावावर नाही, असे सांगत महिन्यांनी त्यांनी १५ लाख रुपये म्हणून पोटगी द्यावी, अशी मागणी करुणा शर्मा यांनी केली.

धनंजय मुंडे यांची ५०० कोटी रुपयांची संपत्ती आहे. त्यांचे वार्षिक उत्पन्न ६५ कोटी रुपये आहे. आधी राजश्री ▶▶ पान २ वर

### "'धनंजय मुंडेंच्या पापाचा घडा भरत आलाय'; तृप्ती देसाई



राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या अडचणींमध्ये मोठी वाढ झाली आहे. फॅमिली कोर्टाने करुणा शर्मा यांचा दावा मान्य करत त्यांना दरमहा २ लाख रुपये पोटगी देण्याचे आदेश दिले आहेत यासोबतच, धनंजय मुंडे यांनी करुणा शर्मा यांच्यावर कौटुंबिक हिंसाचार केला असल्याचेही कोर्टाने मान्य केले आहे. या निकालामुळे धनंजय मुंडे यांना मोठा झटका बसला असून, आता त्यांच्या राजकीय भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी धनंजय मुंडे यांच्यावर टीका करत तात्काळ राजीनामा देण्याची मागणी केली आहे. त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की,

▶▶ पान २ वर

### धनंजय मुंडेंच्या वकिलाचे स्पष्टीकरण

मंत्री धनंजय मुंडे यांचा पाय आणखी खोलात गेला आहे. करुणा मुंडे यांना दरमहा दोन लाख रुपये पोटगी देण्याचा आदेश वांद्रे कौटुंबिक न्यायालयाने दिला आहे. तसेच कोर्टाने त्या धनंजय मुंडे यांच्या पहिली पत्नी असल्याचेही मान्य केले आहे. त्यानंतर धनंजय मुंडे यांच्याकडून कोर्टाच्या निकालाबाबत खुलासा करण्यात आला आहे.धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी कोर्टाच्या आदेशाबाबत स्पष्टीकरण दिले आहे. कोर्टाला घरगुती हिंसाचाराचा कोणताही पुरावा मिळालेला नाही. फक्त आर्थिक परिस्थिती पाहून कोर्टाने पोटगी देण्याचे आदेश दिले आहेत. ▶▶ पान २ वर

# अवैधरित्या राहणाऱ्या भारतीयांना परत भारतात पाठविले




## बेड्या घालून बसविले, ३५ तासांचा प्रवास अन् एकच टॉयलेट

### ट्रम्पनी पाठवून दिलेल्या विमानात महाराष्ट्रातील तिघे

मुंबई , (दिव्य न्युज):- अवैधरित्या राहत असलेल्या भारतीयांना परत भारतात आणण्यासाठी अमेरिकेला भारत सरकारची मंजुरी आवश्यक होती. भारतही घुसखोरीचा सामना करत आहे.अमेरिकेतील घुसखोरांना त्यांच्या त्यांच्या ▶▶ पान २ वर

### पंतप्रधान नरेंद्र मोदी आज प्रयागराजला गंगेत पवित्र डुबकी घेत होते

गंगाविहारचा आनंद घेत होते.सारा मिडिया त्यांच्या मागे धावत होता. पंतप्रधान डुबकी कशी घेतात याचं रसभरीत वर्णन करीत होता.त्याच वेळेस अमेरिकन लष्कराचं एक विमान अमृतसरच्या गुरू रामदासजी आंतरराष्ट्रीय ▶▶ पान २ वर



# रेल्वे प्रशासनाला उर्दू भाषेची एलर्जी का?

## खासदारांना भेट घेवून चर्चा करणार-इमरान जागीरदार

बीड , (दिव्य न्युज):- बीड येथील रेल्वे प्रशासनाकडून उर्द नावाचा विसरन का नियमाप्रमाणे रेल्वे स्टेशनचे नाव तीन भाषेत असतात मराठी इंग्रजी उर्दू मात्र बीड रेल्वे स्टेशन चं नाव उर्दू भाषेत न केल्याने बीडचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांची भेट घेऊन या विषयावर चर्चा करणार इम्रान जागीरदार रेल्वे स्थानकांच्या नावांचे फलक सामान्यतः हिंदी, इंग्रजी आणि स्थानिक भाषांमध्ये लिहिले जातात. उर्दू ही अनेक राज्यांमध्ये स्थानिक भाषा म्हणून मान्यताप्राप्त आहे, त्यामुळे तेथे रेल्वे स्थानकांच्या फलकांवर उर्दूचा समावेश असतो. बीडमध्ये उर्दू भाषेचा समावेश का करण्यात आलेला नाही, याबाबत नेमकी माहिती उपलब्ध नाही. तथापि, उत्तराखंडमधील डेहराडून स्थानकाच्या नावाच्या फलकावर उर्दूऐवजी संस्कृतचा समावेश केल्याने वाद निर्माण झाला होता, ज्यामुळे प्रशासनाने पुन्हा उर्दूचा समावेश केला . या प्रकरणावरून असे दिसते की स्थानिक भाषांच्या समावेशाबाबत धोरणे आणि निर्णय स्थानिक प्रशासनाच्या धोरणांवर अवलंबून असतात.



आपण आपल्या स्थानिक खासदारांना किंवा रेल्वे प्रशासनाला संपर्क साधून बीड रेल्वे स्थानकाच्या फलकांवर उर्दू भाषेचा समावेश करण्याची विनंती करू शकता. स्थानिक भाषांचा सन्मान आणि समावेश सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाला विनंती करणे उपयुक्त ठरू शकते. बीड रेल्वे स्टेशनचा उर्दू भाषेत फलक लावण्यात यावा अशी मागणी जय शिवसंग्राम युवा नेते इमरान जागीरदार यांनी पत्रक द्वारे केली आहे







# शेख तय्यब यांच्या भेटीतून दिसली समाजासाठी तळमळ

### मौलाना आझाद महामंडळ शैक्षणिक कर्जासाठी जामीनदाराची अट रद्द करा







मुंबई, (दिव्य न्युज):- राज्य शासनाने स्थापन केलेल्या विविध महामंडळांचा हेतू त्या त्या समाजातील सर्वसामान्यातील सर्वसामान्य व्यक्तींना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या सदृढ बनवणे होय. परंतु अनेक वेळा काही जाचक अटींमुळे हा हेतू साध्य होताना दिसून येत नाही. अल्पसंख्यांक समाजासाठी उभारलेल्या ▶▶ पान २ वर

कॅशमकश दिव्य वार्ता

अन्यायावर प्रकार, दृष्टांचा संहार

सर्वांच्या मनात आणि प्रत्येकांच्या घरात




14 वा वर्धापन दिन




कार्यक्रम - वाचकांच्या आशिर्वादाने हितचिंतक, शुभचिंतकाच्या सोबतीने

दिनांक : 22 / 02 / 2025 रोजी. शनिवार, वेळ सायं 5 वा.

स्थळ : कोहिनुर लॉन्स, मौलाना युनुस पार्क समोर, तेलगांव रोड, बीड.

### फडणवीसांनी दम भरल्यानंतर काही तासांतच बीडमध्ये धक्कादायक घटना

# तुझाही संतोष देशमुख करण्याची धमकी

बीड , (दिव्य न्युज):-एकीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडचा दौरा करत संतोष देशमुख हत्येसारख्या घटना खपवून घेतल्या जाणार नसल्याचा सज्जड दम भरला होता. पण यानंतर काहीच तासांत बीडमधून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. वाल्मिक कराड व मुंडेसाहेबांच्या बातम्या पाहिल्या तर तुझा संतोष देशमुख करू अशी धमकी देत दोन युवकांनी तरुणाला बेदम मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे.

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड जिल्हा हादरला होता. या हत्या प्रकरणात मुख्य आरोपी वाल्मिक कराडसह नऊ आरोपींवर मकोका कारवाई करण्यात आली आहे. तसेच धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप केले जात आहेत.

### वाल्मिक कराडच्या बातम्या पाहिल्या म्हणुन मारहाण

या हत्येतील मुख्य आरोपी असलेला कृष्णा आंधळे अजूनही फरार आहे. यातच आता केज तालुक्यातील दुसरी खळबळ उडवून देणारी घटना समोर आली आहे.

केज तालुक्यातील किल्ले धारूर पोलीस स्टेशन परिसरात तरनळी गावात (ता. ५)रोजी दुपारी वाल्मिक कराड व मुंडेसाहेबांच्या बातम्या पाहिल्या तर तुझा संतोष देशमुख करू म्हणत गावातील दोन युवकांनी अशोक मोहिते या तरुणाला लाथा बुक्क्या,लोखंडी रॉड,कोयत्याने मारहाण करून गंभीर जखमी केले. त्याच्यावर केज येथील रुग्णालयात उपचार सुरू आहे.

या मारहाणप्रकरणी अशोक मोहिते यांचे मावसभाऊ बाळासाहेब भोसले यांच्या फिर्यादीवरून धारूर पोलीस स्टेशनमध्ये २ जणांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. वैजनाथ भारत बांगर आणि अभिषेक सिद्धेश्वर सानप असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींचे नावे आहेत.ते देशमुख हत्येप्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळे याचे मित्र असल्याची माहिती समोर येत आहे.

केज तालुक्यातील तरनळी गावामध्ये बुधवारी दुपारी अडीच वाजता गावातील रमाई चौकात अशोक शंकर मोहिते हा मोबाईलवर व्हिडिओ पाहत

▶▶ पान २ वर




गाझापट्टीतील उद्ध्वस्त घरे.

**गाझाची व्यथा • इस्रायल-हमास युद्धात अनेक वेळा विस्थापित झालेल्या २.३ लाख पॅलेस्टिनींसाठी एक नवीन संकट**

# ढिगाऱ्यात बदलला गाझा : ९२% घरे तुटली, १९ लाख बेघर

**नवी दिल्ली** | १६ महिन्यांनंतर इस्त्रायल व हमासमधील युद्धाला एक नवीन वळण मिळाले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या गाझा ताब्यात घेण्याच्या योजनेमुळे संपूर्ण पश्चिम आशियात खळबळ उडाली आहे. सध्या युद्धबंदीमुळे इस्त्रायली ओलिस आणि पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका झाली आहे. ट्रम्प यांच्या घोषणेमुळे गाझावासीयांमध्ये भीतीचे वातावरण आहे. युद्धामुळे गाझातील ९२% घरे उद्ध्वस्त झाली आहेत. १९ लाख लोक बेघर आहेत. गाझामध्ये युद्धपूर्व परिस्थिती पूर्ववत होण्यासाठी अनेक दशके लागतील. त्याचवेळी, पॅलेस्टिनींना जॉर्डन आणि इतर देशांमध्ये विस्थापित करण्याच्या ट्रम्पच्या योजनेमुळे २३ लाख लोकांच्या चिंता वाढल्या आहेत. युद्धामुळे गाझाचा विकास ७० वर्षे मागे गेला आहे. १६ महिन्यांत गाझावर काय परिणाम झाला आहे ते जाणून घ्या....

### गाझा : २% लोक मृत्युमुखी, ९०% लोक तंबूत!




एकूण लोकसंख्येच्या २% लोकांचा मृत्यू, मृतांमध्ये १३ हजार मुले | लॅन्सेटच्या अभ्यासानुसार ७० हजारांपर्यंत मृत्यूंचा अंदाज. हजारो मृतदेह ढिगाऱ्याखाली

### इस्रायल :१६०० लोक मारले गेले, ७९ लोग हमासकडे

- या संघर्षादरम्यान १,६४२ इस्त्रायली मारले गेले. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासच्या दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात १,२०० लोक मारले गेले.
- २५१ ओलिसांना इस्त्रायलमधून गाझा येथे नेले. पैकी ३७ जणांचा मृत्यू झाला.
- सुमारे ७९ इस्त्रायली अजूनही हमासकडे बंधक आहेत. युद्धबंदी अंतर्गत दोन्ही बाजू टप्प्याटप्प्याने त्यांच्या सुटकेसाठी काम करत आहेत.

### नवीन सुरुवातीपूर्वी पाच कोटी टन मलबा हटवणे हे मोठे आव्हान, अन्नासाठी पूर्णत: जगावर अवलंबून

**घर : ढिगारा इतका की १०० ट्रक १५ वर्षे काम करतील तेव्हा होईल स्वच्छ**




घर 4,36,000 नुकसानग्रस्त वा पूर्णपणे नष्ट | स्कूल 534 नुकसानग्रस्त वा पूर्णपणे नष्ट झाले | रस्ते तुटले, पाण्याचे स्त्रोत 25% ही वाचले नाही



- गाझामध्ये पाच कोटी टन मलबा पडलाय. ही मात्रा इतकी की गिझाचा ग्रेट पिरॅमिड १२ वेळा भरता येईल.
- जरी १०० ट्रक २४ तास काम करत असले तरी, मलबा काढण्यासाठी १५ वर्षे लागतील. १० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च येईल.

**उपचार : रुग्णालये उरली नाहीत, १२ लाख लोकांना श्वसनाचे त्रास**


| | | |
|---|---|---|
| 36 सर्व रुग्णालयांचे नुकसान, १७ अंशतः कार्यरत | 654 हल्ले आरोग्य सुविधांवर झाले. त्यामुळे मोठे नुकसान. | 1050+ डॉक्टर, नर्स व आरोग्य कर्मचारी हल्ल्यात मेले. |

**गाझात ५.६ लाख लोक अतिसाराने ग्रस्त**

आरोग्य सुविधांना जाणूनबुजून लक्ष्य केले. रुग्णालयांच्या कमतरतेमुळे हल्ल्यातील जखमी आणि वाचलेल्यांच्या दुःखात भर पडली.

२०२४ मध्ये श्वसन संसर्गाची १२ लाख प्रकरणे होती. सुमारे ५.७ लाख लोकांना अतिसाराचा त्रास झाला. गर्भवती महिला आणि बाळाची प्रकृती गंभीर आहे.

**...अन् भाकरी : ९६% शेती साधने नष्ट, ९१% लोकांवर उपासमारीची वेळ**




- ९६% शेतीशी संबंधित मालमत्ता नष्ट झाली. गाझा पूर्णपणे बाह्य मदतीवर अवलंबून आहे. मदतीवर इस्त्रायलचे नियंत्रण. दरमहा १५००० ट्रक मालाची आवश्यकता. डिसेंबरमध्ये फक्त २,२०५ ट्रक आले.

पान १ वरून

## करूणा मुंडेंच

असं जीवन जगणं अवघड आहे. समोर मोठे मोठे वकील होते. पण माझ्या वकिलांचे मी आभार मानते, त्यांनी एक रुपयाही न घेता माझी केस लढवली. बीडचे वकील गणेश कोल्हे यांनी माझी केस लढवली. एक महिला म्हणून मोठ्या शक्तीसोबत लढणं खूप अवघड असतं. माझ्यासोबत एक केवळ वकील होता. माझ्या मागणीनुसार पैसे मिळाले नाहीत. १९९६ पासून मी माझ्या नवऱ्यासोबत आहे. मी पुन्हा हायकोर्टात जाणार आहे. धनंजय मुंडे यांचे वकील मी धनंजय मुंडेंची बायको नाही, असा युक्तीवाद करत होते. पण माझ्या वकिलांनी सिद्ध करून दाखवलं की मीच धनंजय मुंडे यांची बायको आहे आणि पहिली बायको आहे, असंही करुणा मुंडे म्हणाल्या.

## धनंजय मुंडे यांची

धनंजय मुंडे यांच्या नावावर संपत्ती नव्हती. पण जेव्हापासून माझे आणि धनंजय यांचे भांडण सुरू झाले, तेव्हा त्यांनी राजश्री यांच्या नावावर संपत्ती केली. राजश्री यांच्या नावावर संपत्ती करताना त्यांनी मला किंवा आमच्या मुलांना अजिबात विचारले नव्हते. आमच्या नावावर त्यांची एकही रुपयांची प्रॉपर्टी नाही, असे करुणा मुंडे म्हणाल्या.

करुणा मुंडे म्हणाल्या, धनंजय मुंडे यांनी माझ्याशी १९९८ साली लग्न केले. त्यानंतर त्यांनी राजश्री यांच्याशी लग्न केले. किंबहुना राजश्री मुंडे यांच्याबरोबर लग्न करताना माझी त्यांनी परवानगीही घेतली नव्हती. मी त्यावेळी इंदौरला होते. त्यांच्या दोघांच्या लग्नाला मी याआधीच न्यायालयात चॅलेंज केले आहे. अर्थात मी त्यांची पहिली पत्नी आहे.

धनंजय मुंडे यांनी निवडणूक शपथपत्रात माझ्या नावाचा उल्लेख केलेला नाही

धनंजय मुंडे यांनी निवडणूक शपथपत्रात माझ्या नावाचा उल्लेख केलेला नाहीये. त्यामुळे निवडणूक आयोगाकडे मी तक्रार दाखल केली आहे. नैतिकतेच्या आधारावर त्यांनी आमदार राजीनामा द्यायला हवा, असे सांगत देवेंद्र फडणवीस यांचा वरदहस्त धनंजय मुंडे यांच्यावर पूर्वापार आहे, असा गंभीर आरोपही करुणा मुंडे यांनी केला.

वांद्रे न्यायालयाच्या निर्देशाविरोधात मी उच्च न्यायालयात जाणार

प्रति महिना १५ लाख पोटगी मिळावी, अशी माझी मागणी होती परंतु न्यायालयाने दोन लाख पोटगी देण्याचे निर्देश दिले आहेत. वांद्रे न्यायालयाच्या निर्देशाविरोधात मी उच्च न्यायालयात जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. वाढीव पोटगी करुणा मुंडे आणि त्यांच्या मुलीला वाटून देण्यात येणार आहे.

शपथपत्रात किती संपत्तीचा उल्लेख?

दुसरीकडे २०२४ विधानसभेचा उमेदवारी अर्ज भरताना धनंजय मुंडे यांनी त्यांच्या संपत्तीचे विवरणपत्र दिले होते. त्यानुसार धनंजय मुंडे यांच्याकडे ५३ कोटी ८० लाख रुपयांची संपत्ती असल्याचे त्यांनी नमूद केले, हे नमूद करण्यासारखी बाब आहे.

धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी काय स्पष्टीकरण दिलं?

कोर्टाचा आदेश फक्त अंतरिम पोटगीचा धनंजय मुंडे यांनी काही चुकीचं केलंय असं कोर्टाला आढळलं नाही करुणा शर्मा यांच्यासोबत राहत होतो, हे धनंजय मुंडे यांनी आधीच मान्य केलंय हे ग्राह्य धरूनच कोर्टाने आजचे आदेश दिले आहेत

## 'धनंजय मुंडेंच्या पापाचा घडा

करुणा शर्मा यांनी न्यायालयीन लढा देत अखेर आपला हक्क सिद्ध केला आहे. त्यांनी वारंवार आपण धनंजय मुंडे यांच्या पहिल्या पत्नी असल्याचा दावा केला होता आणि घरगुती हिंसाचाराचे आरोप लावले होते. न्यायालयाने त्यांना न्याय दिला असून, धनंजय मुंडे यांनी नैतिकतेच्या आधारावर राजीनामा द्यावा, असे तृप्ती देसाई म्हणाल्या.

आता करुणा शर्मा नव्हे, करुणा मुंडे

तृप्ती देसाई यांनी सांगितले की, करुणा शर्मा यांनी अनेकदा सांगितले होते की त्या धनंजय मुंडे यांच्या पत्नी आहेत. त्यामुळे आता त्यांना करुणा मुंडे म्हणून संबोधले पाहिजे. तसेच, मुंडे यांच्यावरील आरोप गंभीर असून, त्यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून अनेक गोष्टी लपवल्याचा आरोप तृप्ती देसाई यांनी केला.

धनंजय मुंडे यांच्यावर आधीच अनेक आरोप आहेत, आणि हे प्रकरण म्हणजे फक्त सुरुवात आहे, असेही तृप्ती देसाई म्हणाल्या. यापूर्वीही खंडणी आणि हत्येच्या प्रकरणांमध्ये त्यांचे नाव जोडले गेले आहे. त्यामुळे नैतिक जबाबदारी स्वीकारून त्यांनी त्वरित मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी तृप्ती देसाई यांनी केली आहे.करुणा शर्मा प्रकरणात झटका बसणं ही तर सुरुवात आहे. मुंडेंना कोर्टाचा हा पहिला झटका मिळाला आहे. मुंडेंचा राजीनामा होणं गरजेचं आहे. कोर्टाचा निर्णय पॉझिटिव्ह आला. त्यामुळे या पुढचे निर्णय सकारात्मक होतील. त्यामुळे धनंजय मुंडेंचा राजीनामा होणं गरजेचं आहे, असंही त्या म्हणाल्या.

## धनंजय मुंडेंच्या

करुणा यांच्यासोबत लिव्ह इनमध्ये राहत होतो, असे मुंडेंनी आधीच कोर्टात मान्य केले आहे, असे वकिलांनी म्हटले आहे.

आताचा आदेश केवळ अंतरिम पोटगीचा आहे. घरगुती हिंसाचार अजून कोर्टात सिध्द नाही.धनंजय मुंडेंनी काही चुकीचं केलंय, असं कोर्टाला काही आढळलं नाही, असेही वकिलांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, करुणा मुंडे यांनी कोर्टाच्या आदेशानंतर आपणच धनंजय मुंडे यांच्या पहिल्या पत्नी असल्याचे कोर्टात सिध्द झाल्याची प्रतिक्रिया दिली आहे.

वांद्र कोर्टाने पोटगीबाबत दिलेला निकाल करुणा मुंडे यांना मान्य नाही. त्यांनी याविरोधात हायकोर्टात दाद मागणार असल्याचे म्हटले आहे. त्यांनी वांद्रे कोर्टात १५ लाख रुपये पोटगीची मागणी केली होती. पण कोर्टाने दोन लाख रुपये पोटगीचे आदेश दिले आहे. याविरोधात हायकोर्टात जाणार असल्याचे मुंडेंनी म्हटले आहे.

कोर्टाच्या निकालावर मीडियाशी बोलताना करुणा मुंडे म्हणाल्या, एका मंत्रीपदावर असलेल्या व्यक्तीविरोधात ही लढाई होती. मी खूप सोसले आहे. मी १९९६ पासून त्यांच्यासोबत आहे. माझ्या कुटुंबासाठी १५ लाख रुपये पोटगी मागितली होती. त्यासाठी हायकोर्टात जाणार आहे. मीच धनंजय मुंडे यांची पहिली पत्नी होती. माझे उत्पन्न काही नाही. माझ्या नवऱ्याने जी गाडी दिली होती, ती माझ्याकडून घेऊन त्यांच्या वकिलाला दिली. येरवडा, बीड कारागृहात मला डांबण्यात आले होते. गाडीत रिव्हॉल्वर ठेवण्यात आले होते.

## अवैधरित्या राहणाऱ्या

भारताकडे उड्डाण केले होते.हे लष्करी विमान अमृतसर विमानतळावर उतरले आहे. या विमानामध्ये हरियाणा आणि गुजरातचे प्रत्येकी ३३, पंजाबचे ३० आणि महाराष्ट्राचे तीन जण आहेत. तसेच उत्तर प्रदेश-चंदीगढचे प्रत्येकी दोन लोक आहेत. यामध्ये काही नवरा-बायको-मुले असे कुटुंबही आहे.सुरक्षा अधिकाऱ्यांनुसार पंजाब, हरियाणाच्या लोकांना रस्ते मार्गानेच त्याच्या घरी पाठविले जाणार आहे. तर गुजरात, महाराष्ट्र व युपीच्या लोकांना विमानाने पुढे पाठवून दिले जाणार आहे. अमेरिकेने २०५ लोकांना भारतात पाठविण्यासाठी तयारी केली होती. परंतू पहिले १०४ जण आले आहेत.

अमेरिकेने १५ लाख अनधिकृत प्रवाशांची यादी बनविली आहे. जे अमेरिकेत या ना त्या मार्गाने घुसलेले आहेत. या लोकांमुळे अमेरिकेचा प्रचंड पैसा वाया जातो, तसेच मूळ अमेरिकन नागरिकांचा हक्क डावलला जातो असा ट्रम्प यांचा आरोप आहे. यामध्ये १८ हजार भारतीय आहेत.सर्वात आधी वाईट लोकांना बाहेर काढणार असल्याचे ट्रम्पनी निवडणुकीत म्हटले होते.अवैधरित्या राहत असलेल्या भारतीयांना परत भारतात आणण्यासाठी अमेरिकेला भारत सरकारची मंजुरी आवश्यक होती. भारतही घुसखोरीचा सामना करत आहे. ट्रम्प यांनी ही मोहिम सुरु केल्यानंतर परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांच्याशी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी चर्चा केली होती. तेव्हा आम्ही त्या लोकांना परत भारतात घेण्यास तयार असल्याचे जयशंकर यांनी कळविले होते.

प्यू रिसर्च सेंटरच्या २०२२ च्या अहवालानुसार, अमेरिकेत सुमारे ७.२५ लाख बेकायदेशीर भारतीय स्थलांतरित राहतात. ही संख्या बेकायदेशीर स्थलांतरितांच्या संख्येत तिसऱ्या क्रमांकाची आहे. सध्या जो आकडा आहे तो १८ हजार एवढा आहे. म्हणजेच सध्या अमेरिकन प्रशासनाला या १८ हजार जणांची माहिती आहे. उर्वरित लोकांची माहिती यानंतर गोळा केली जाण्याची शक्यता आहे.

या प्रवाशांना त्यांच्या देशात नेऊन सोडण्याचा खर्च अमेरिकाच उचलत आहे. अवाढव्य असलेली मिलिट्री प्लेनचा वापर यासाठी केला जात आहे. चार्टर्ड फ्लाईटच्या तुलनेत हा पाच ते सहा पटींनी जास्त आहे. टेक्सास ते ग्वाटेमालाला पाठविलेल्या विमानाचा एका प्रवाशामागे ४ लाख रुपए खर्च आला होता. विमानाचे तिकीट ७४ हजार रुपये होते.भारतात पाठविलेल्या लोकांना बेड्या घालण्यात आल्या होत्या. विमानात फक्त एकच टॉयलेट होते. या लोकांना अशा स्थितीत ३५ तास प्रवास करावा लागला आहे. या लोकांना एखाद्या गुन्हेगारासारखी वागणूक देण्यात आली आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी

अमेरिकन लष्करी विमान निघाले तेव्हा गुस्तावो पेट्रो यांनी ते विमान आपल्या भूमीवर उतरण्याची परवानगी नाकारली.. आर्थिक निर्बंध लादण्याची अमेरिकेने धमकी दिल्यानंतरही पेट्रो जराही विचलित झाले नाहीत.. आपल्या भूमीकेवर ठाम राहिले..

आपले विमान पाठवून त्यांनी आपल्या नागरिकांना सन्मानाने मायदेशी आणले.. हा असतो राष्ट्रवाद.. हा असतो स्वाभिमान आपण काय केलं..? हातात बेड्या ठोकलेल्या अवस्थेत, अत्यंत अपमानीत पध्दतीने १०४ भारतीयांना अमेरिकेने आज आपल्या लष्करी विमानातून भारतात पाठवून दिलं. आपण बेशरमपणे अमेरिकेच्या लष्करी विमानाला भारताच्या भूमीवर उतरण्याची परवानगी दिली का? कोलंबिया सारखा एक छोटा देश जो स्वाभिमान दाखवू शकतो, तसा स्वाभिमान भारताला का दाखवता आला नाही? या सगळ्या विषयावर मोदी मौन बाळगून आहेत. मोदी बोलले नाहीत, बोलत नाहीत उलट ही बातमी भारतीयांना समजणार नाही याची काळजी घेतली गेली..जिथं विमान उतरलं तिकडं मिडियाला फिरू दिलं नाही शिवाय प्रयागराज भेटीचा मुहूर्त नरेंद्र मोदी यांनी आजचा यासाठी निवडला की, मिडियाचे लक्ष अमेरिकन लष्करी विमानाच्या लॅन्डिंगकडे जाताच कामा नये.. त्यात नरेंद्र मोदी यशस्वी झाले.. मिडियावर अमेरिकन दादागिरीची नाही तर नरेंद्र मोदींच्या डुबकीचीच चर्चा दिवसभर सुरू होती.. दोन मुद्दे आहेत.. भारतीयांना परत आणण्यासाठी नरेंद्र मोदी यांनी कोलंबिया प्रमाणे आपले विमान का पाठवले नाही? अन दुसरी गोष्ट, जंग जंग पछाडलयानंतर देखील डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळयास नरेंद्र मोदी यांना अमेरिकेने निमंत्रित केलं नाही, तरीही नरेंद्र मोदी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना आपले मित्र मानतात.. हरकत नाही.. पण पंतप्रधानांनी आपल्या मित्राला किमान भारतीयांना बेड्या ठोकून पाठवू नका अशी विनंती का केली नाही? बरं नाही केली तर आतातरी अमेरिकेच्या या कृत्याबद्दल त्यांचा निषेध करण्याची हिंमत भारत दाखविणार आहे का? जागतिक शक्ती होण्याची स्वप्न भारतीयांना दाखविणारया सरकारने आज देशाची मान शरमेनं खाली जाईल अशीच कचखाऊ भूमिका घेतली आहे..

देवयानी खोब्रागडे प्रकरण आठवतंय? त्यांना जेव्हा अमेरिकेत अपमानित केलं गेलं तेव्हा भारतानं कठोर भूमिका घेतली. अखेर अमेरिकेने माफी मागितली. डॉ. मनमोहन सिंग तेव्हा भारताचे पंतप्रधान होते.अन आज ५६ इंचची भाषा करणारे नरेंद्र मोदी पंतप्रधान आहेत.फरक हा आहे.

## शेख तय्यब यांच्या

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत दिल्या जाणार्या शैक्षणिक कर्जाबाबतही मालमत्ताधारक व नोकरदार जामीनदाराची अट असल्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज घेताना अडचणी येत आहेत. ती अडचण पाहून महामंडळाचे संचालक तथा सायं. दैनिक बीड रिपोर्टरचे संपादक शेख तय्यब यांनी सदरची अट रद्द करण्यात यावी याबाबत अल्पसंख्याक मंत्री दत्तात्रय भरणे मामा, अध्यक्ष मुश्ताक अंतुले, सचिव रुचेश जयवंशी, उपसचिव विशाखा आढाव व व्यवस्थापकीय संचालक ग.पि. मकदूम या सर्वांसोबत चर्चा करत विद्यार्थ्यांच्या अडचणी समजावून सांगितल्या व निवेदनाद्वारे संबंधित अट रद्द करण्याची मागणी केली. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शेख तय्यब यांनी गेल्या चार महिन्यांच्या कालखंडात क्रियाशील होत सर्वप्रथम मराठवाड्याचा आणि नंतर विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, खानदेशाचा दौरा करून तेथील अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यालयात भेटी देत तिथल्या अडीअडचणी समजून घेण्याबरोबर लोकांची कामे करण्याबाबतच्या सूचना दिल्या होत्या. या दौर्यात राज्यभरातील अल्पसंख्याक समाजातल्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कर्जाबाबत काही अडचणी शेख तय्यब यांच्या कानावर घातल्या. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शेख तय्यब यांना शैक्षणिक कर्जातली प्रमुख अडचण उमजून आली. अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी जेव्हा शैक्षणिक कर्ज घेण्यासाठी अर्ज करतात तेव्हा कर्ज मंजुरीसाठी दोन जामीनदारांची गरज असते. त्यामध्ये प्रामुख्याने एक मालमत्ता ज्याच्याकडे आहे तो आणि दुसरा नोकरदार, गोरगरीब विद्यार्थ्यांना हे दोन्ही जामीनदार मिळत नाहीत. जामीन देण्यासाठी त्यांच्याकडे मालमत्ता नसते अशा वेळी ते शैक्षणिक कर्जापासून वंचित राहतात. परिणामी विद्यार्थी हुशार, कर्तृत्ववान असताना केवळ आर्थिक परिस्थितीमुळे त्याला पुढील शिक्षण घेता येत नाही. या सर्व बाबी उमजून घेत संचालक शेख तय्यब यांनी काल थेट अल्पसंख्यांक मंत्री दत्तात्रय भरणे मामा व मुश्ताक अंतुले यांची भेट घेत शैक्षणिक कर्जाबाबत सविस्तर चर्चा करून विद्यार्थ्यांच्या अडचणी त्यांच्या समोर मांडत शैक्षणिक कर्ज योजनेसाठी लागणारी मालमत्ता धारक व नोकरदार जामीनदाराची अट रद्द करण्याची मागणी केली. त्या आशयाचे निवेदन मंत्री महोदयांबरोबर सचीव रुचेश जयवंशी, उपसचिव विशाखा आढाव, व्यवस्थापकीय संचालक ग.पि. मकदूम यांनाही दिल्या असून त्यांच्या सोबतही चर्चा करण्यात आली आहे. या सर्वांनी निवेदनाचा सकारात्मक विचार करू, असे ओशासन दिले आहे.

## तुझाही संतोष देशमुख

होता.त्याचवेळी एका लाल रंगाच्या चक ४४ ठ ९२९४ क्रमांक असलेल्या दुचाकीवर वैजनाथ भारत बांगर, अभिषेक सिद्धेश्वर सानप हे आले.त्यांनी अशोक मोहिते याला लाथाबुक्या,लोखंडी रॉड,कोयत्याने मारहाण केली व यापुढे वाल्मिक कराड व मुंडेसाहेबांच्या बातम्या पाहिल्या तर तुझा संतोष देशमुख करू म्हणत शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली.